▮ बुधवार, ८ फेब्रुवारी २०१७

# पुण्य नगरी
# Smart Mumbai




शोएबने घटवले २० किलो वजन!

▮ पान २ वर...



वायएमसीए फुटबॉल : एसिक अजिंक्य

▮ पान ४ वर...

## HighLights

### गेट वे ऑफ इंडिया भूआर्थिक परिषदेचे आयोजन

▮ **मुंबई** : विदेशी नातेसंबंध दृढ करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मुंबईतील गेट वे हाऊस या मान्यवर संस्थेने येत्या १३ आणि १४ फेब्रुवारी २०१७ ला दुसऱ्या गेट वे ऑफ इंडिया भूआर्थिक परिषदेचे आयोजन केले आहे. केंद्र सरकारचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालय या परिषदेचे सहआयोजक आहेत. भारत आणि विदेशातील विविध क्षेत्रांमधील तज्ज्ञ मंडळी या परिषदेत सहभागी होणार आहेत. गेल्या जून महिन्यात या परिषदेचे पहिले पुष्प गुंफण्यात आले होते. त्यानंतर गेल्या काही महिन्यांमध्ये जगभरात विविध महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. या घटनांच्या पार्श्वभूमीवर भारतानेही जागतिक पातळीवर आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. या परिषदेच्या आयोजनामुळे मुंबईतील उद्योजकांना चर्चासत्रांमध्ये भाग घेण्याची अनोखी संधी मिळाली असून आपल्या कल्पनाही जागतिक क्षेत्रामधील तज्ज्ञांबरोबर शेअर करता येणार आहेत.

### संस्कार भारतीचे महानाट्य

▮ **मुंबई** : नाट्यशास्त्राचे जनक भरतमुनींच्या जयंती दिनाच्या निमित्ताने ११ फेब्रुवारीला एकाच वेळी ७०० महानाट्यांचे सादरीकरण संस्कार भारतीच्या वतीने करण्यात येणार आहे. हा एक प्रकारचा जागतिक विक्रम होणार असल्याची माहिती भारतीचे कार्याध्यक्ष प्रमोद पवार यांनी पत्रकार संघ येथे मंगळवारी दिली. श्रीकृष्णाच्या जीवनातील मूल्यावर आधारित हे महानाट्य आजच्या धकाधकीच्या, ताणतणावाच्या जीवनाला एक वेगळी दिशा देणारे ठरेल, असे पवार म्हणाले. विनामूल्य असणारे हे महानाट्य देशभरात त्या त्या राज्यांच्या भाषेत सादर होणार आहे. ७० हजार कलावंत या यज्ञात सहभागी होणार आहेत, असे पवार म्हणाले.

### ट्युटोरियल व्यवसायाची संधी

▮ **मुंबई** : शिक्षणाच्या क्षेत्रात शिकवण्याबरोबरच व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध असतात; परंतु त्याची सर्वांना माहिती असतेच असे नाही. स्वतःचा ट्युटोरियल बिझनेस करायचा असेल तर कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, याबाबत विनामूल्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी आणि मॅथ्स या विषयांमध्ये बी.एस.सी. तसेच एम.एस.सी. शिक्षण पूर्ण केलेल्या व्यक्तींसाठी हे मार्गदर्शन शिबीर शुक्रवार, १० फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ६.३० वाजता सी/१०५, मारुती दर्शन, हनुमान चौकाजवळ, मुलुंड पूर्व येथे होणार आहे.

### ...तर यापुढचे आंदोलन तीव्र करणार

▮ **मुंबई** : विनाअनुदानित शाळांत केंद्र सरकारचे नियम पाळले जात नाहीत. गोरगरीब मुलांना प्रवेश दिला जात नाही. या पार्श्वभूमीवर मंगळवारी आझाद मैदानात आंदोलन करण्यात आले. या वेळी शेकडो पालक व विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले होते. सरकारने या मागण्यांचा विचार केला नाही, तर यापुढचे आंदोलन तीव्र करू, असा इशारा अनुदानित शिक्षा बचाव व डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने दिला. केंद्र सरकारने कायदा केला असताना या कायद्याला केराची टोपली दाखवली जात आहे, असे डॉ. एस. एम. परांजपे यांनी या वेळी सांगितले. शिक्षणासारखे पवित्र काम जर भ्रष्टाचाराचे कुरण होत असेल तर यासारखे दुसरे पाप नाही. जागतिक निकषानुसार सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे, मात्र भारतात असे होताना दिसत नाही.

### फेसबुकवर तरुणीची बदनामी

▮ **उल्हासनगर** : एका तरुणीचे व तिच्या मित्राचे फोटो कुठूनतरी प्राप्त करून ते फेसबुकवर अपलोड करून त्या खाली अश्लील कमेंट्स लिहून त्या तरुणीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केल्याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्हासनगरातील कॅम्प ४ परिसरात राहणाऱ्या एका तरुणीच्या नावाने अज्ञात व्यक्तीने फेसबुकवर खोटे अकाऊंट तयार केले.

# उमेदवारांच्या मालमत्तांमध्ये वाढ

▮ भालचंद्र देव

**मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत उभ्या राहिलेल्या उमेदवारांपैकी मागील वेळी निवडून आलेल्या नगरसेवक- नगरसेविकांच्या मालमत्तेमध्ये गेल्या पाच वर्षांत वाढ झाल्याचे दिसून आले आहे. यामध्ये सर्वच पक्षांच्या उमेदवारांचा समावेश आहे. सभागृह नेत्या तृष्णा विश्वासराव, भाजपाचे ज्येष्ठ नेते मनोज कोटक, समाजवादी पार्टीचे रईस शेख, माजी महापौर श्रद्धा जाधव, स्थायी समितीचे अध्यक्ष यशोधर फणसे यांनी या वेळी निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे :**

## तृष्णा विश्वासराव यांचे वार्षिक उत्पन्न २५ लाख रुपये



मुंबई पालिकेच्या शिवसेनेच्या ज्येष्ठ नगरसेविका आणि सभागृह नेत्या तृष्णा विश्वासराव यांचे वार्षिक उत्पन्न २५ लाख १३ हजार रुपये असून २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांची मालमत्ता एक कोटी दोन लाख रुपये होती.



त्यात गेल्या पाच वर्षांत वाढ होऊन ती तब्बल नऊ कोटी ६९ लाख रुपये एवढी झाली आहे. विश्वासराव या शिवसेनेच्या तिकिटावर अँटॉप हिल विभागातून निवडणूक लढवत असून, राज्य निवडणूक आयोगाला शपथेवर जाहीर केलेल्या माहितीपत्रात ही आकेडवारी जाहीर केली आहे. नववी शिकलेल्या विश्वासराव यांचा व्यवसाय असून त्यांच्याविरोधात एकही फौजदारी गुन्हा दाखल नाही. २०१७ मध्ये त्यांची मालमत्ता एकूण नऊ कोटी ६९ लाख रुपये असून, त्यात सहा कोटी २४ लाखांच्या इस्टेटचाही समावेश आहे.

## फणसेंचे वार्षिक उत्पन्न एक कोटी ३२ लाख ७० हजार रुपये

महापालिकेच्या आर्थिक नाड्या असलेल्या स्थायी समितीचे अध्यक्ष यशोधर फणसे यांचे सध्याचे वार्षिक उत्पन्न एक कोटी ३२ लाख ७० हजार रुपये असून, त्यांची जंगम मालमत्ता तीन कोटी १२ लाख ८१ हजार रुपयांची आहे. तर स्थावर मालमत्ता पाच कोटी ३५ लाखांहून अधिक आहे. २०१२ मध्येही फणसे यांनी पालिकेची निवडणूक लढवली होती, त्या वेळी त्यांच्या मालमत्तेचे एकूण मूल्य चार कोटी ४५ लाख रुपयांहून अधिक होते. फणसे आणि त्यांची पत्नी यांनी २०१५-१६ मध्ये अनुक्रमे एक कोटी सात लाख ६१ हजार ३८५ रुपये आणि २५ लाख ८ हजार ६८२ रुपये आयकर भरला आहे. फणसे यांच्या बडोद्यात दोन व्यापारी स्थावर मालमत्ता असून, त्यांचे सध्याच्या बाजारभावानुसार प्रत्येकी ९० लाख आणि ९३ लाख रुपये मुल्य आहे. त्यांची रत्नागिरी जिल्ह्यात दापोली येथे कृषी जमीन असून, त्याचे बाजारभावानूसार मूल्य सहा लाख ९२ हजार १०० रुपये आहे.



## रईस शेख यांची चार कोटी मालमत्ता



समाजवादी पक्षाचे नगरसेवक आणि गटनेते यांनी २०१२ मध्ये पालिका निवडणूक लढवली, त्या वेळी त्यांनी अवघे ३७ लाख ७९ हजार रुपयांची मालमत्ता जाहीर केली होती. मात्र गेल्या पाच वर्षांत ती वाढून चार कोटी ४६ लाख रुपये इतकी झाली आहे. त्यात दोन कोटी १० लाख रुपयांच्या इस्टेटचा समावेश आहे. या वेळी २०१७ मध्ये पालिका निवडणुकीत ते दक्षिण मुंबईतील मदनपुरा येथून निवडणूक लढवत असून, निवडणूक आयोगाला त्यांनी ही आकडेवारी सादर केली आहे. पदवीधर असलेल्या शेख यांचे वार्षिक उत्पन्न ११ लाख ५१ हजार रुपये इतके आहे, असे त्यांनी शपथपत्रात नमूद केले आहे.

## श्रद्धा जाधव यांची मालमत्ता २५ कोटींची



शिवसेनेच्या नगरसेविका आणि माजी महापौर यांनी त्यांची सध्याची मालमत्ता २४ कोटी ९३ लाख रुपये जाहीर केली असून, त्यात इस्टेट प्रॉपर्टीचे मुल्य १५ कोटी ९३ लाख रुपये आहे. बारावी उत्तीर्ण असलेल्या जाधव यांनी २०१२ मध्ये ही पालिका निवडणूक लढवली होती. त्यांनी एक कोटी ७३ लाख रुपयांची मालमत्ता घोषित केली होती. मात्र माजी महापौरांचे वार्षिक उत्पन्न अवघे ५३ लाख रुपये इतके आहे.

## मनोज कोटक यांची सध्याची मालमत्ता चार कोटी ९७ लाखांची



भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक आणि गटनेते मनोज कोटक यांची सध्याची मालमत्ता चार कोटी ९७ लाख रुपयांची असून २०१२ मध्ये झालेल्या पालिकेच्या निवडणुकीत ते निवडून आले होते. त्या वेळी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाला सादर केलेल्या शपथपत्रात दोन कोटी ६४ लाखांची मालमत्ता जाहीर केली होती. त्यांचे वार्षिक उत्पन्न २१ लाख ४३ हजार रुपये आहे. चार कोटी ९७ लाखांच्या मालमत्तेत दोन कोटी ३३ लाखांची इस्टेटचाही समावेश आहे.

# वांद्रे रेल्वे स्थानकालगतच्या झोपड्या कधी हटणार?



▮ **मुंबई** : जोगेश्वरी रेल्वे स्थानकाला लागून असणाऱ्या रेल्वे अंतर्गत भूखंडावर १२० झोपड्या पाडण्याचे आदेश न्यायालयाने दिल्यानंतर पूर्व व पश्चिम रेल्वे स्थानकांलगतच्या झोपड्या हटवण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेली अनेक वर्षे वांद्रे रेल्वे स्थानकाला लागून असणाऱ्या झोपड्यांमुळे अनेकदा उपद्रव सहन करावा लागूनही या झोपड्या पाडण्याबाबत मात्र कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

मुंबईच्या पूर्व व पश्चिम व हार्बर रेल्वे मार्गावर रेल्वे प्रशासनांतर्गत असणाऱ्या भूखंडावर अनधिकृत झोपड्यांचे वास्तव्य गेली अनेक वर्षे दिसून येत आहे. मात्र या झोपड्यांवर कारवाई करण्याऐवजी दरवर्षागणिक या झोपड्यांमध्ये वाढ होताना दिसून येत आहे. आश्चर्य म्हणजे या झोपड्या अनधिकृत असूनही येथे पाणी, वीज सुविधा रहिवाशांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जोगेश्वरी इंदिरा नगर येथील १२० झोपड्या पाडण्याचे आदेश पश्चिम रेल्वे प्रशासनाला देण्यात आले आहे. याप्रमाणेच वांद्रे पूर्व स्थानकाला अनधिकृत तीनमजली झोपड्यांचा विळखा आहे. रेल्वे प्रशासनाने याबाबत कारवाई केलेली नाही. येथे स्कायवॉक उभारल्यानंतरही पादचाऱ्यांना येथील रहिवाशांचा उपद्रव सहन करावा लागत होता. मात्र याकडे पोलीस व संबंधित संस्थांनी दुर्लक्ष करत परिस्थिती जैसे थे ठेवण्यावर भर दिला आहे. मुंबई महानगरपालिकेने किंवा रेल्वे प्रशासनाने कारवाईचे धोरण स्वीकारल्यास अनेकदा राजकीय हस्तक्षेपामुळे कारवाई करता येत नसल्याचे सूत्रांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानंतर का होईना रेल्वे प्रशासन जागे होणार का आणि रेल्वेस्थानकांलगतच्या झोपड्या हटणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.




**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने चव्हाण सेंटर येथे बुधवारी ओम पुरी यांना श्रद्धांजली पर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास शाम बेनेगल, गोविंद निहलानी, कुमार केतकर, हेमंत टकले, अतुल तिवारी आदी उपस्थित होते.**

# सांताक्रुझच्या ग्रँड हयात हॉटेलची ॲमॅनिटी, करमणुकीची जागा पालिकेने घेतली ताब्यात

**लोकायुक्तांच्या आदेशानुसार कारवाई**

▮ **मुंबई** : सांताक्रुझ येथील ग्रँड हयात हॉटेलची साडेसात टक्के ॲमॅनिटी जागा आणि १० टक्के अतिरिक्त जागा (रिक्रीएशन ग्राऊंड) महापालिकेच्या एच पूर्व विभागाच्या विकास नियोजन विभागाच्या सहाय्यक अभियंत्यांनी सोमवारी ताब्यात घेतली.

मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या दोन्ही जागा ताब्यात घेण्याची नोटीस महापालिकेने या हॉटेलची मालकी असलेल्या ज्युनिपर हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष अमित सराफ यांना बजावली होती. लोकायुक्तांच्या आदेशानुसार महापालिकेने ही नोटीस बजावल्यामुळे हॉटेल क्षेत्रात खळबळ उडाली होती. ॲमॅनिटी आणि रिक्रीएशन ग्राऊंडची जागा त्वरित १० दिवसांत पालिकेला हस्तांतरित करण्याची नोटीस पश्चिम उपनगरांतील




पालिकेच्या एच विभागाच्या इमारत प्रस्ताव विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी पाठवली होती. हयात हॉटेल रिक्रिएशन ग्राऊंडवर कूलिंग टॉवर उभारणार होते, पण त्याला दिलेली परवानगीही एच पूर्व विभागाने रद्द केली आहे. सांताक्रुझ येथील कोळेकल्याण गावात सीटीएस क्रमांक ३४५४ डी येथे आणि ३४५४ ई येथे ग्रँड हयातची अनुक्रमे १९९२.१० आणि २९८८.१० चौरस मीटरची मोठी जागा मोक्याच्या ठिकाणी आहे. या दोन्ही मोठ्या जागांवर ॲमिनिटी स्पेसचे आरक्षण आहे. ही जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सोमवारी पालिकेच्या इमारत प्रस्ताव आणि विकास नियोजन विभागाच्या सहाय्यक अभियंत्यांच्या उपस्थितीत पार पडली. या वेळी हॉटेलचे वरिष्ठ उपाध्यक्ष अमित सराफ उपस्थित होते.

# उशिराच्या निदानामुळे मुंबईत कॅन्सरच्या प्रमाणात वाढ

▮ **मुंबई** : मुंबईतील एकूण कॅन्सर रुग्णांपैकी ६४ टक्क्यांहून जास्त रुग्णांमध्ये दक्षिण भारतातील इतर शहरांच्या तुलनेमध्ये दुसऱ्या किंवा नंतरच्या टप्प्यात कॅन्सरचे निदान केले गेले. उशिरा झालेल्या या निदानामुळे मुंबई शहरात कॅन्सर रुग्णांत वाढ झाली आहे. ग्लेनेएग्लेस ग्लोबल हॉस्पिटल्समार्फ त करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून हा निष्कर्ष समोर आला आहे.

बंगळुरू, मुंबई, कोलकाता आणि हैदराबाद या महत्त्वपूर्ण शहरांमध्ये २०-२५ वयोगटातील पुरुष आणि स्त्रियांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणातील अहवालानुसार, लोकांद्वारे योग्य निदानापासून कॅन्सरच्या वेळेवर केल्या जाणाऱ्या उपचारापर्यंत सोसल्या जात असलेल्या व्यथा टिपण्यात आल्या असून ज्या आजाराला व्यवस्थापित करण्यासाठी वाट पाहण्याच्या वेदनेमध्ये परिणामीत होतात. मुंबईमधल्या ५०



टक्के प्रतिक्रिया देणाऱ्यांमध्ये डॉक्टरांची कॅन्सरची लक्षणे ओळखण्यातील असमर्थता निदर्शनास आली आहे, परंतु दक्षिण भारतातील ९७ टक्के लोकांनी सांगितले की, त्यांचे फॅमिली फिजिशियन्स लक्षणांना समजण्यासाठी प्रभावी आहेत. तसेच कॅन्सर निदान चाचण्यांच्या संदर्भात ४० टक्क्यांहून कमी लोकांनी मुंबई आणि पश्चिम भारतातील इतर भागांमध्ये पीईटी स्कॅन, एफएनली, जेनेटिकसारख्या विशेष चाचण्यांचा अंतर्भाव केला आहे. तर इतर शहरांतील ७० टक्के लोकांनी चाचण्या करून उपचारदेखील सुरू केले आहेत. मुंबईमध्ये इतर भागांच्या तुलनेमध्ये उपचार सुरू करण्यात जास्त उशीर होतो. या संदर्भात त्यांना विचारणा केली असता ते म्हणाले, महागडे उपचार, कॅन्सर वारंवार उद्भवणे, भावनिक ताण संपवण्यासाठी भावनिक समुपदेशनाची कमतरता असे त्यांच्या व्यक्तिगत अनुभवातील चिंतेचे विषय आहेत. त्यामुळेच इतर शहरांपेक्षा मुंबईत कॅन्सरच्या प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

# निसर्गाच्या विविध रूपांचे चित्रप्रदर्शन







▮ **मुंबई** : प्रसिद्ध व ज्येष्ठ चित्रकार राधा फडतरे व चंद्रकांत फडतरे यांनी साकारलेल्या वास्तववादी चित्रांचे प्रदर्शन मुंबईतील नरिमन पॉइंट येथील बजाज भवनमध्ये असलेल्या प्रसिद्ध कमलनयन बजाज आर्ट गॅलरीमध्ये भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन रसिकांना दि. ६ ते ११ फेब्रुवारी या दरम्यान रोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत पाहायला मिळणार आहे. चित्रकार राधा फडतरे व चंद्रकांत फडतरे यांची आतापर्यंत भारतात तसेच परदेशात मिळून एकूण ४५ सामूहिक कला प्रदर्शने भरविण्यात आली आहेत. प्रस्तुत प्रदर्शनात त्यांनी निसर्ग व त्याची विविध रूपे व त्याची वैशिष्ट्ये यांचे रम्य व वास्तववादी दर्शन घडवले आहे.

चित्रकर्ती राधा लोहार-फडतरे यांनी तैलरंग, जलरंगाचा वापर करून रोलर व नाईफचा उपयोग करून बनविलेली विविध चित्रे निसर्गाचे वैभव व वेगवेगळ्या ऋतूमध्ये आढळणारी निसर्गाची विविध मोहक रूपे दर्शवितात. मुख्यतः तैलरंग वापरून कॅनव्हासवर साकारलेली त्यांची चित्रे गुलमोहर, बहावा व इतर नैमितिक फुलांचे व पानांचे तसेच आसपासच्या निसर्गाचे मनोहर दर्शन घडवतात. नैसर्गिक सौंदर्य व विविध ऋतूंमध्ये आढळणारी सृष्टीची रूपे त्यांनी आपल्या चित्रांतून साकारली आहेत.

चित्रकार चंद्रकांत फडतरे यांनी तैलरंग, जलरंग वापरून कॅनव्हासवर साकारलेली चित्रे जीवनातील वास्तववादी पैलूंचे रम्य दर्शन घडवितात. वैशिष्ट्यपूर्ण व कलात्मक संकल्पनातून त्यांनी निसर्गाचा आशयपूर्ण आविष्कार मूर्त व अमूर्त शैलीत साकारला आहे.

# 'तुतारी' शिल्पाचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार

▮ **मुंबई** : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या 'तुतारी' शिल्पाचे अनावरण तसेच पद्मश्री मधु मंगेश कर्णिक साहित्य दालनाचे, सभागृहाचे आणि व्यासपीठाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या २५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. मालगुंड (गणपतीपुळे) येथे होणार आहे.

कवी केशवसूत स्मारक संकुल परिसरात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार विनायक राऊत, पालकमंत्री रवींद्र वायकर, मुंबई भाजपाध्यक्ष ॲड. आशिष शेलार, आमदार उदय सामंत, आमदार संजय केळकर आदी मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. याप्रसंगी बुकगंगा डॉट कॉमचे प्रवर्तक मंदार जोगळेकर, मालगुंड येथील कवी केशवसूत स्मारक ग्रंथालयास एक लाख रुपये किमतीची पुस्तके मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भेट देणार आहेत. पूर्वसंध्येला २४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ४.३० वा. ग्रामपंचायत मालगुंड ते कवी केशवसूत स्मारकापर्यंत ग्रंथपालखी, त्यानंतर कोमसापच्या ६० शाखांमधील कवी-कवयित्रींचे कवी शशिकांत तिरोडकर यांच्या अध्यक्षतेखाली कविता महासंमेलन होईल. आघाडीचे कवी किरण येले आणि मेघना साने या संमेलनाचे सूत्रसंचालन करतील.

२५ फेब्रुवारी रोजी उद्घाटन सोहळ्यानंतर दुपारी २.३० वा. अखिल भारतीय साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांचा सत्कार कोमसापचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. महेश केळुसकर करतील. मराठी साहित्य संस्थात्मक व्यवहार या विषयावर या दोघांशी नमिता किर संवाद साधतील. दुपारी ३.३० वाजता कोमसापच्या या वर्षीच्या वाङ्मय पुरस्कार विजेत्यांशी चर्चात्मक संवाद साधतील गौरी सावंत, उषा परब, रवींद्र आवटी. सायंकाळी ५ वाजता निमंत्रित कवींचे कवी संमेलन अशोक नायगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यात महेश केळुसकर, सौमित्र, अरुण म्हात्रे, पुष्पाग्रज (गोवा), मधुसूदन नानीवडेकर, नितीन केळकर (पुणे) आणि प्रदीप पाटील (इस्लामपूर) हे कवी आपल्या कविता सादर करतील. यानंतर ६.३० वा. कोमसापचा युवाशक्ती कलाविष्कार सादर होईल. यानंतर सायंकाळी ७.३० वा. मंगेश म्हस्के लिखित व दिग्दर्शित कोमसाप सिंधुदुर्ग निर्मित विभागीय पहिले पारितोषिक विजेती एकांकिका मदर्स डे सादर होईल. त्यानंतर माणगाव शाखेची जिल्हास्तरीय प्रथम पारितोषिक विजेती सुरेखा दांडेकर दिग्दर्शित पर्यावरणीय मंगळागौर सादर करण्यात येईल. रात्रौ ९.३० वा. केशवसूत यांच्या कवितांवर आधारित नृत्याविष्काराचा कार्यक्रम होईल.



रविवार, २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. मराठी भाषा व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते कोकण साहित्य भूषण, कविता राजधानी आदी महत्त्वाचे वाङ्मयीन पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या वेळी मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला विनोद तावडे 'मराठी भाषा व साहित्य संस्कृती' यावर आपले विचार प्रकट करतील, अशी माहिती कोकण मराठी साहित्य परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. महेश केळुसकर यांनी दिली.